N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
## (Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सांगली **P.S.(ठाणे):** विश्राम बाग
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0628 **Year (वर्ष):** 2023
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**11/12/2023 23:29

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिनांक पासून):** 11/12/2023
**Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):** 11/12/2023
**Time From (वेळेपासून):** 09:36 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 17:40 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 11/12/2023 **Time (वेळ):** 23:29 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 037
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 11/12/2023 23:29 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** Oral
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 2.0 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** कंपाऊंडचे बाहेर पुर्व बाजुस असा,जिल्हा न्यायालया सांगली ,सांगली

(c)**In case, outside the limit of this Police Station, then**
(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** प्रदीप बापूसाहेब बर्गे

(b) **Father's Name (वडील चे नाव) :** बापूसाहेब बर्गे

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1971

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पारापोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | गुलमोहर अपार्टमेंट,गावभाग सांगली, तामिरज,सांगली,विश्राम बाग,सांगली, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | गुलमोहर अपार्टमेंट,गावभाग सांगली, तामिरज,सांगली,विश्राम बाग,सांगली, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सोमनाथ तातोबा माळी | | पालक का नाम : तातोबा माळी | 1. गणेश कलनी,मालगाव,मिरज, जि सांगली,विश्राम बाग,सांगली, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with OKEN Scanner

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

वर्दी जबाब दि.11.12.2023
मी प्रदीप बापूसाहेब बर्गे, वय 52 वर्ष, व्यवसाय:- कनसल्टींग इंजिनीअर, रा. गुलमोहर अपार्टमेंट, गावभाग सांगली, ता.मिरज जि. सांगली, मो.नं 9763174100.

मी वरील ठिकाणी माझ्या कुटुंबासहीत राहण्यास आहे. माझी मुलगी कु.पायल बर्गे हिने दिले फिर्यादीवरून विश्रामबाग पोलीस ठाणे गु.र.नं.183/2020, भा.दं.सं.क.354, 354अ, 506 अन्वये चंद्रकांत माने यांचेविरूध्द नोव्हेंबर 2020 मध्ये गुन्हा दाखल आहे. सदर केसची सुनावणी जे.एम.एफ.सी. पाटील कोर्ट सांगली येथे सुरू आहे.

तसेच चंद्रकांत माने यांनी दिले फिर्यादीवरून विश्रामबाग पोलीस ठाणे गु.र.नं.185/2020, भा.दं.सं.क. 384,354(अ), 143, 147,149 अन्वये माझेविरूध्द व माझी पत्नी सौ.सुनिता बर्गे, मुलगी कु.पायल बर्गे, व सुभाष शंकर संकपाळ, शोभा आप्पासो हेगडे यांचेविरूध्द वरीलप्रमाणे नोव्हेंबर 2020 मध्ये गुन्हा दाखल आहे. सदर केसची सुनावणी ही मा. जे.एम.एफ.सी. लोंढे कोर्ट, सांगली यांचे समोर सुरू आहे. आमचेविरूध्द दाखल असलेल्या केसची सरकारी पक्षातर्फे अँड.सोमनाथ माळी, सहा.सरकारी वकील हे काम पाहतात.

आमचेत व चंद्रकांत माने यांचेमध्ये तडजोड झालेली असून सदरच्या केसेस काढून घेणे संदर्भातची कारवाई मा. जे.एम.एफ.सी. लोंढे कोर्ट सांगली यांचे समोर सुरू आहे.

दि.05.12.2023 रोजी आमचे वकील श्री. किरण शिंदे यांची भेट घेणेसाठी सांगली कोर्टामध्ये गेलो होतो परंतू अँड.किरण शिंदे हे बाहेरगावी असल्याने त्यांची भेट होवू शकली नाही म्हणून मी सांगली कोर्टातून परत येत असताना मला अँड.सोमनाथ माळी, सहा.सरकारी वकील हे कोर्टामध्ये भेटले. त्यावेळी मी त्यांचेशी केसच्या अनुषंगाने चर्चा करून मुलगीचे लग्न ठरविण्याचे काम सुरू आहे. केसमुळे लग्नाचे कामामध्ये अडचणी येत आहेत असे सांगितले. त्यावेळी अँड.सोमनाथ माळी, सहा.सरकारी वकील यांनी तडजोड करून केस निकाली काढण्याचे काम लवकर करतो त्यासाठी 25,000/- रूपये द्यावे लागतील, असे म्हणून त्यांनी माझ्याकडे 25,000/- रूपये लाचेची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना माझी परिस्थीती नसलेबाबत सांगितले. त्यावेळी त्यांनी मला पुढील तारीख दि. 11.12.2023 रोजी नेमलेली आहे त्या तारखेच्या आत पैशाची जुळणी करा नाहीतर मी सहकार्य करणार नाही असे म्हणाले व तारखेदिवशी सकाळी कोर्ट आवाराचे बाहेर चहाचे दुकाना जवळ भेटण्यास सांगितले. मला अँड. सोमनाथ माळी, सहा.सरकारी वकील यांना मला लाच देण्याची इच्छा नाही. मी नाईलाजास्तव दि.11.12.2023 रोजी अँड.सोमनाथ माळी, सहा.सरकारी वकील यांची सांगली कोर्टचे बाहेर चहाचे दुकाना जवळ जावून भेट घेवून लाच रक्कम कमी करणेबाबत चर्चा करणार आहे. तरी त्यांचेवर कारवाई व्हावी ही विनंती. असे मजकुराची हस्तलिखीत तक्रार दि.08.12.2023 रोजी पोलीस निरीक्षक, श्री दत्तात्रय पुजारी, अँन्टी करप्शन ब्युरो सांगली यांना दिली. त्यानंतर पुजारी साहेबांनी माझा तक्रारी अर्ज वाचुन त्यावर सही केली. त्यानंतर पुजारी साहेबांनी मला दि.11.12.2023 रोजी सकाळी 09.00 वाजता चाण्यक्यपुरी गार्डन, ऐंशी फुटी रोड विश्रामबाग सांगली येथे हजर राहण्याच्या सुचना देऊन जाण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी निघुन गेलो.

दि.11.12.2023 रोजी सकाळी 09.00 वाजता पुजारी साहेबांनी दिले सुचने प्रमाणे मी माझे कडील फोक्स वॅगन पोलो कार नंबर एम.एच. 03 ए.डब्लू 6844 ने चाण्यक्यपुरी गार्डन, ऐंशी फुटी रोड विश्रामबाग सांगली येथे हजर झालो. त्यावेळी पाटील साहेब, पुजारी साहेब, भिलारे साहेब व त्यांचा कार्यालयीन स्टाफ असे हजर होते. पुजारी साहेबांनी दिले सुचने प्रमाणे मी शासकीय बुलेरो जीपमध्ये बसलो. त्यावेळी पुजारी साहेबांनी अधिकारी व कर्मचारी यांची ओळख करून दिली. त्याव्यतिरिक्त इतर दोन इसमांची पंच 1) श्री रामचंद्र बिरा माने व पंच नं 2) श्री रवि सुरेश मस्के अशी ओळख करून दिली. मला माझी लाच मागणीची तक्रार थोडक्यात कथन करणे बाबत पुजारी साहेबांनी सुचना दिल्या, त्याप्रमाणे मी माझी तक्रार थोडक्यात कथन केली. त्यानंतर पुजारी साहेबांनी माझा लाच मागणीचा तक्रारी अर्ज दोन्ही पंचाना वाचण्यास दिला. लाच मागणीचा अर्ज दोन्ही पंचानी वाचून मी तोंडी सांगीतलेली तक्रार व तक्रारी अर्जातील मजकुर एकच असल्याची खात्री करुन तक्रारी अर्जावर सही केली.



Scanned with OKEN Scanner

त्यानंतर पुजारी साहेबांनी मी दिले लाच मागणी तक्रारी अर्जाचे अनुषंगाने ॲड.सोमनाथ माळी, सहा.सरकारी वकील यांचेकडे पडताळणी करण्याचे निश्चित करुन मला व दोन्ही पंचाना त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्याची संपूर्ण माहिती देऊन त्या व्हाइस रेकॉर्डरमधे त्यांचेकडील नवीन मेमरीकार्ड टाकले त्यानंतर मला तसेच पंच श्री माने यांना पडताळणीकामी योग्य त्या सुचना देऊन त्यांच्याकडील व्हॉईस रेकॉर्डर चालू करुन त्यास असले लेसद्वारे माझे गळ्यामध्ये अडकवला. त्यानंतर मला व पंच श्री माने यांना ॲड.सोमनाथ माळी यांची जिल्हा न्यायालयाचे आवाराचे बाहेर चहाचे दुकाना जवळ भेट घेणेकरीता रवाना होणेकरीता इशारा केला. त्याप्रमाणे मी व पंच माने असे माझ्याकडील फोक्स वॅगन पोलो एम.एच. 03 ए.डब्लू 6844 सकाळी 09.36 वाजणेचे सुमारास रवाना होऊन जिल्हा न्यायालयाचे बाहेर दाखल झालो. मी व पंच माने असे ॲड.सोमनाथ माळी यांची वाट पाहत जिल्हा न्यायालयाचे गेटचे बाहेरील बाजुस चहाचे दुकाना जवळ थांबलो. काही वेळाने ॲड.सोमनाथ माळी हे त्यांचेकडील बुलेट मोटर सायकलवरुन येताना दिसले. मी माळी साहेबांना हाक मारली ते न्यायालयाचे पार्कींगमध्ये मोटर सायकल पार्क करुन गेटचे बाहेर आले. मी माळी साहेबांना चहा घेण्यास येणे बाबत विनंती केली. मी पंच माने व ॲड माळी असे चहा पिणेस कोर्ट कंपाऊंडचे पुर्व बाजुस असलेला रस्ता ओलांडुन पुर्वेस असलेल्या गोविंद हॉटेलमध्ये चहा घेण्यास जात असताना मी ॲड माळी यांना "माझ्या मुलगीचे लग्न आहे. चंद्रकांत माने व आमच्यामधील केस मिटवुन घेणेचे सुरु आहे. आमच्या केसेस संपवायला मदत करा" असे म्हणालो. त्यावेळी त्यांनी मला "परवा बोल्लेल केला काय?" असे विचारले त्यावर मी त्यांना "पंचवीस हजार जास्त होतात जरा कमी करा की" असे म्हणुन पंधरा हजार रुपये पर्यंत कमी करणे बाबत विनंती केली. त्यावेळी ॲड माळी साहेबांनी चंद्रकांत मानेंच्या पार्टीकडून पन्नास हजार रुपयांची ऑफर आली असल्याचे सांगुन, वीस हजार रुपये करणेस सांगीतले. त्यावर मी त्यांना पंधरा हजार रुपये पर्यंत कमी करणे बाबत पुन्हा विनंती केली परंतु त्यांनी विनंती अमान्य करुन लाच रक्कम वर जायच्या आधी पटकन आणुन देण्यास सांगीतले. त्यावर मी ॲड माळी साहेबांना पैसे एटीएम मधुन काढुन घेऊन येतो असे सांगुन मी व पंच माने असे चहाचे दुकानामधुन चहा घेऊन बाहेर आलो व माझेकडील कारने रवाना होऊन ऐंशी फुटी रोड जवळील चाणक्यपुरी गार्डन जवळ हजर झालो. तेथे पुजारी साहेबांनी मला व पंच माने यांना हकीकत विचारुन तसेच व्हॉईस रेकॉर्डरमधे झालेले रेकॉडींग ऐकुण खात्री केली. पुजारी साहेबांनी मी दिलेल्या लाच मागणी अर्जाचे अनुषंगाने ॲड माळी यांचेकडे केलेल्या पडताळणी कारवाईमध्ये ॲड माळी यांनी चंद्रकांत माने व आमचेत असलेल्या केसेस संपवण्यास मदत करण्यासाठी माझेकडे वीस हजार रुपये मागीतल्याचे निष्पन्न झाले. त्यावेळी पुजारी साहेबांनी मला वीस हजार रुपये रक्कम हजर करणेस सांगीतली, त्यावेळी मी पुजारी साहेबांना आत्ता वीस हजार रुपये उपलब्ध नसल्याचे सांगीतले. त्यानंतर आम्ही सर्व चाणक्यपुरी गार्डन जवळुन रवाना होऊन अँन्टी करप्शन कार्यालय सांगली येथे दाखल झालो. त्यावेळी मी पुजारी साहेबांना वीस हजार रुपयांची जुळणी करुन घेऊन येतो असे सांगून अँन्टी करप्शन कार्यालय सांगली येथून निघून गेलो.

त्यानंतर दुपारी 3.50 वाजण्याचे सुमारास वीस हजार रुपये लाच रक्कमेची जुळणी करुन अँन्टी करप्शन कार्यालय सांगली येथे पुजारी साहेबांचे समक्ष हजर झालो. पुजारी साहेबांनी दिले सुचने प्रमाणे मी लाच रक्कम त्यांचे समक्ष हजर केली. त्यानंतर ॲड सोमनाथ माळी, सहा.सरकारी वकील यांच्यावर सापळा कारवाई करण्याच्या अनुषंगाने सर्व सापळापुर्व कार्यवाही करण्यात आली व मी हजर केलेली लाच रक्कम वीस हजार रुपये नोटांना अँथ्रासीन पावडर लावुन सदरच्या नोटा माझे पॅन्टचे उजवे बाजुचे खिश्यात ठेवल्या, त्यानंतर मला दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना त्यांच्या कामाच्या अनुषंगाने पुजारी साहेबांनी योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर ॲड माळी यांच्यावर सापळाकारवाई करण्याकरीता व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन त्यास असले लेस द्वारे माझ्या गळ्यामध्ये अडकवला. त्यानंतर मला व पंच माने यांना माझ्याकडील फोक्स वॅगन पोलो कार नं. एम.एच. 03 ए.डब्लू 6844 वरुन जिल्हा न्यायालयाचे बाहेर ॲड माळी यांची भेट घेणेकरीता रवाना केले. तसेच आमचे पाठोपाठ पाटील साहेब, पुजारी साहेब, भिलारे साहेब पंच मस्के व सापळा पथक असे सरकारी वाहनातून व मोटर सायकली वरुन सदर ठिकाणी येऊन परिसरात सापळा लावुन थांबले. ॲड श्री माळी कोर्ट कामकाज संपले नंतर त्यांचे बुलेट मोटर सायकलवरुन जात असताना मी त्यांना हाक मारली, माळी साहेबांनी त्यांचेकडील मोटर सायकल काही अंतरावर विजयनगरकडे जाणारे रोड कडेला थांबवली. मी माळी साहेबांचे जवळ गेलो. माझे पाठोपाठ पंच माने सदर ठिकाणी आले. मी माळी साहेबांना सकाळी सांगीतलेल्या पैशाची पुर्तता केली असल्याचे सांगुन चहा पिण्यास येणे बाबत विनंती केली, माळी साहेबांनी चहा नको मुलीची शाळा सुटली आहे. इथेच पैसे द्या असे म्हणुन त्यांनी माझेकडे लाचेची मागणी केल्याने मी माझे पॅन्टचे उजवे बाजुच्या खिशातील अँथ्रासीन पावडर लावुन ठेवलेली लाच रक्कम वीस हजार रुपये माझे उजवे हाताने बाहेर काढुन माळी साहेबांचे समोर धरली असता माळी साहेबांनी वीस हजार रुपये लाच रक्कम त्यांचे उजवे हाताने स्विकारुन त्यांचे अंगावरील शर्टचे छातीवरील डावे बाजुचे खिशात ठेवली. त्यानंतर मी माझे पॅन्टचे पाठीमागील डाव्या बाजुच्या खिश्यातील रुमाल बाहेर काढुन तोंड पुसुन लाच स्विकारले



Scanned with OKEN Scanner

बाबत पुर्व नियोजीत इशारा केला. त्यानंतर ॲड माळी यांनी माझे काम झाले असले बाबत सांगुन ते मोटर सायकल वरुन रवाना झाले. ॲड माळी यांचे पाठोपाठ मोटर सायकल वरुन पाटील साहेब व सरकारी बुलेरो वाहनातुन पुजारी साहेब पंच माने व मस्के व सापळा पथक गेलेले दिसले. त्यानंतर काही वेळाने पुजारी साहेबांनी संपर्क करुन मला श्रीमती राजमती नेमगोंडा पाटील गर्ल हायस्कुल व जुनीअर कॉलेज नेमीनाथ नगर सांगली येथे येण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी माझेकडील कारने सदर ठिकाणी दाखल झालो. ॲड माळी यांना 17.40 वा. चे सुमारास पकडले असल्याचे पुजारी साहेबांनी सांगीतले.
सदर ठिकाणी पुजारी साहेबांनी ॲड माळी यांना त्यांचे नाव गांव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव सोमनाथ तातोबा माळी, वय 36 वर्ष, पद - सहा. सरकारी अभियोक्ता सांगली, वर्ग - 1, रा. गणेश कॉलनी, मालगाव ता. मिरज, जि. सांगली असे असल्याचे सांगीतले. सदर ठिकाणी लाचेच्या सापळ्यातील प्राथमिक तपासण्या करुन पुढील सविस्तर पडताळणी सापळापूर्व सापळा पंचनामा तसेच इतर कार्यवाही ही ॲन्टी करप्शन ब्युरो, सांगलीच्या कार्यालयात पूर्ण करण्यात आली.
तरी दि.11.12.2023 रोजी आरोपी लोकसेवक श्री. सोमनाथ तातोबा माळी, वय 34 वर्ष, पद - सहा. सरकारी अभियोक्ता सांगली, रा. गणेश कॉलनी,मालगाव, ता. मिरज, जि. सांगली यांनी आपले स्वतःचे पदाचा दुरुपयोग करून माझेत व चंद्रकांत माने यांचेत सुरु असलेल्या केसेस तडजोड करुन लवकर संपवण्यास मदत करण्यासाठी माझ्याकडे वीस हजार रुपये लाचेची मागणी करुन जिल्हा न्यायालयाचे कंपाऊंडचे पुर्व बाजुस असलेल्या रोडवर माझ्याकडून वीस हजार रुपये लाच रक्कम स्वतः स्वीकारली आहे, म्हणून माझी आरोपी लोकसेवक श्री. सोमनाथ तातोबा माळी, वय 36 वर्ष, पद - सहा. सरकारी अभियोक्ता सांगली, रा. गणेश कॉलनी,मालगाव, ता. मिरज, जि. सांगली यांचेविरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.
माझा वरील फिर्यादी जबाब हा संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो प्रिंट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.
समक्ष हा दिला वर्दीजबाब

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

or (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
tanaji namdev kumbhar
**Rank (पद):** SI (Sub-Inspector) **No.(क्र.):** dgptnkm8301
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



Scanned with OKEN Scanner

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) Transferred to P.S.
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):
on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

14 Signature/Thumb impression of the complainant / informant.
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. Date and time of dispatch to the court
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

Signature of Officer in charge, Police Station
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): SANJAY SHIVAJIRAO
Rank(पद): I (inspector)
No.(सं.): PBMAH72651



Scanned with OKEN Scanner